# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

**प्रस्तावना :-**

**विषय :- वॉर्ड क्र. १६ मधील जय अंबे सोसायटी ते मारुती किराणा स्टोर्स ते जैन मंदिर कमला हॉटेल पर्यंत नविन नाला तयार करणे बाबत.**

वॉर्ड क्र. १६ मधील जय अंबे सोसायटी ते मारुती किराणा स्टोर्स ते जैन मंदिर कमला हॉटेल पर्यंत नविन नाला तयार करणे. याकामी "नाले, गटर व मोऱ्या बांधणे " या मनपा निधीच्या लेखाशिर्ष अंतर्गत एकुण रक्कम रु. १,९९,९१,५८४/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करुन सदर प्रस्ताव मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे प्रशासकीय मंजुरी करिता सादर करण्यांत आला असुन, सदर प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक २३/०७/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये प्रशासकीय ठराव करणेकामी मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्रं. :-** ४६८ **दिनांक :-** 2/८/२०२४

वॉर्ड क्र. १६ मधील जय अंबे सोसायटी ते मारुती किराणा स्टोर्स ते जैन मंदिर कमला हॉटेल पर्यंत नविन नाला तयार करणे. याकामी "नाले, गटर व मोऱ्या बांधणे" या मनपा निधीच्या लेखाशिर्ष अंतर्गत रक्कम रु. १,९९,९१,५८४/- इतक्या रक्कमेचे प्रस्तावास प्र. शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेष:त कलम ४५२ अ (१अ)व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार वरिल नमुद कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका